



गुढी पाडव्यानिमित्त ठाणेवैभवने ठाणे आणि कल्याणच्या स्वागत यात्रेच्या प्रवासावर एक विशेष पुरवणी साकारली. कल्याण स्वागत यात्रेचे रौप्य महोत्सव होते. त्याचे प्रकाशन आ. विश्वनाथ भोईर, संस्कृती मंचचे अध्यक्ष निशिकांत बुधकर, ऋतू ग्रुपचे संचालक मुकुंद पटेल, ठाणेवैभवचे संपादक मिलिंद बल्लाळ, संस्कृती मंचचे डॉ. सुश्रुत वैद्य, आयएमए कल्याण आणि स्वागत यात्रेचे समन्वयक डॉ. प्रशांत पाटील, बुधकर पब्लिसिटीचे निखिल बुधकर आणि ठाणेवैभवचे व्यवस्थापकीय संपादक निखिल बल्लाळ यांनी कल्याण येथील फडके मैदानात केले. त्याचबरोबर कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासातर्फे आयोजित करण्यात येणारी ठाण्याची यात्रा यंदा 25 व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यावर देखील एक विशेष पुरवणी साकरण्यात आली. त्याचे प्रकाशन कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासाचे अध्यक्ष उत्तम जोशी, ठाणेवैभवचे संपादक मिलिंद बल्लाळ, श्री रामकृष्ण नेत्रालयचे संचालक डॉ. नितीन देशपांडे, डॉ. नरेंद्र पाठक, संजीव ब्रह्मे आणि ठाणेवैभवचे व्यवस्थापकीय संपादक निखिल बल्लाळ यांच्या हस्ते पार पडले.

Main Edition
Apr 10, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com